**सुप्रिया सुळे,** खासदार
(लोकसभा)

दिनांक : ०५/०२/२०२५
जा. क्र. : पुणे/एनएचएआय/०९/२०२४

बारामती लोकसभा मतदार संघातील भोर व राजगड हे तालुके ऐतिहासिक वारसा लाभलेले असल्याने येथील ऐतिहासिक स्थळे, दुर्ग, मंदिरे, धरणे, निसर्ग यांना हजारो पर्यटक भेट देत असतात. पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ मार्गावरून या भोर वल्हे तालुक्यातील पर्यटन स्थळांकडे जाण्याचा मार्ग दर्शविणारे फलक लावल्यास पर्यटकांना सदर ऐतिहासिक स्थळे, वास्तु पर्यंत पोहोचणे सोयीचे होईल. तरी कृपया राष्ट्रीय महामार्ग ४८ वर खालील चार ठिकाणी पर्यटन स्थळे, ऐतिहासिक स्थळे याबाबत माहिती देणारे फलक लावण्यात यावेत, त्याचबरोबर भोर व राजगड तालुक्यातील या मार्गावरील उड्डाण पूलांच्या भितींवर त्या त्या ठिकाणचा इतिहास दर्शविणारी भित्तिचित्रे रेखटण्यात यावीत.

१. **कोंढणपुर फाटा :**
किल्ले सिंहगड
श्री तुकाई माता देवस्थान

२. **शिवापुर :**
कमर अली दरवेश दरगाह

३. **चेलाडी फाटा :**
स्वराज्याचे पहिले तोरण - किल्ले तोरणा
स्वराज्याची पहिली राजधानी - किल्ले राजगड

४. **कापुरव्होळ :**
येसाजी कंक जलाशय (भाटघर धरण)
स्वराज्याची शपथ घेतली ते ठिकाण - श्री रायरेश्वर पठार
किल्ले रोहिडेश्वर
नीरा देवघर धरण

आपली

सुप्रिया सुळे

प्रति,
प्रकल्प संचालक,
राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण
वारजे, पुणे

प्रत रवाना : श्री. प्रदीप मरळ, राजगड तालुका, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार

**दिल्ली** : सी-१/७, लोधी गार्डन, नवी दिल्ली - ११० ००३
• दूरध्वनी: ०११-२३०१८८७० / २३०१८६११ • टेलीफॅक्स: ०११-२३०१८६०१ • ई-मेल: supriyassule@gmail.com

**मुंबई** : सिल्व्हर ओक इस्टेट, बंगला नं. २, १ ला मजला, भुलाबाई देसाई रोड, मुंबई - ४०० ०२६
• दूरध्वनी: ०२२-२२८७२३४७ (कार्यालय), ०२२-२३७१७२२२ (निवास) • टेलीफॅक्स: ०२२-२२८१३०१८

**पुणे** : इ १७ निसर्ग, मार्केट यार्ड, पुणे - ४११ ०३७